International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मराठी कवितेत अलीकडच्या काळातील समाज माध्यमांची भूमिका

**श्री. गणेश सुभाष ढगे**

*पीएच.डी.संशोधक विद्यार्थी,*

*अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर पुणे, २८, महाराष्ट्र, भारत.*

*Corresponding Author – श्री. गणेश सुभाष ढगे*

**DOI - 10.5281/zenodo.18654152**

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याला खूप जूनी परंपरा आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाटातील शिलालेखाचा आधार घेऊन 'मराठी अभिजात भाषा' समितीने मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे असले पाहिजे, असा निष्कर्ष अभ्यास समितीने २०१३ च्या अहवालात नोंदविला आहे. इ.स. १०१२ च्या अक्षीच्या शिलालेखात मराठी वाक्य मिश्र स्वरूपात लिहिलेले दिसून येते. पुढे इ.स.१११६ च्या श्रवणबेळगोळच्या शिलालेखातही 'श्री चावुण्डराजे करवियले' मराठी लिखित वाक्य कोरलेले सापडते. यावरून दहाव्या-अकराव्या शतकात मराठी शब्दरूपाने, अकराव्या शतकात वाक्य रूपाने आणि बाराव्या शतकात ग्रंथरूपाने आढळते. बोलीभाषेच्या किंवा लोकभाषेच्या स्वरूपात जवळपास अडीच हजार वर्षे अशी जुनी परंपरा मराठी भाषेला आहे.

अशी ही जुनी परंपरा असलेल्या भाषेचे आज विपुल साहित्य व प्रकार उपलब्ध आहेत. मराठी साहित्य म्हटले की कथा, कविता, कादंबरी व नाटक असे स्वरूप आपणास पाहावयास मिळते. मराठी साहित्यात महत्त्वाचा वाटा आहे तो काव्याचा. मराठी भाषेतील प्राचीन साहित्य हे सर्व काव्य स्वरूपात निर्माण झालेले आहे. मराठी साहित्य संसाराला बाराव्या शतकापासून सुरुवात झालेली दिसून येते. मराठीतील आद्यकवी मुकुंदराज यांनी लिहिलेला 'विवेकसिंधू' हा मराठीतील आद्यग्रंथ काव्य स्वरूपातच आहे. महानुभावीय सातीग्रंथ ओवीबद्ध काव्यग्रंथच आहेत. तेराव्या शतकामधील ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' म्हणजे महाराष्ट्रीय शारदेच्या गळयातील देशीकार लेणे' असे म्हटले जाते, ती ज्ञानेश्वरांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी सुद्धा ओवीबद्ध काव्य स्वरूपातच आहे. संत ज्ञानेश्वराप्रमाणेच संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांची अभंगरचना, कीर्तने हे सर्व काव्यरचनाच आहे. संत काव्याप्रमाणेच पंडिती काव्य, शाहीरी काव्य, लोक काव्य ही सर्व काव्यरचनाच आहे. एकूणच मराठी काव्यात ओवी, अभंग, कीर्तने, आरत्या, भजने, गवळणी, भारुडे ते आजच्या काळातील चारोळी, गझल, चित्रपट गीते, नाट्यसंगीत यांचा समावेश होतो.

मराठी साहित्यामध्ये कविता एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. काव्यात्म जगणं ही एक मानवी वृत्ती आहे. काव्याच्या माध्यमातून भावना अभिव्यक्त करणे सोपे असते. कवितेच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या भावना इतरांच्या हृदयापर्यंत सहज पोहोचतात. कविता ही हृदयाची मातृभाषा असते. कविता करण्यासाठी वेगळं काही शिकावं लागत नाही. तरुणपणात काव्य हा अनुभवाचा घटक असतो. सुरुवातीच्या काळात प्रत्येक साहित्यिक हा कवीच असतो. कवितेचे गेयता, लयबद्धता, यमक, प्रसादता या गुणांमुळे काव्य दीर्घकाळ स्मरणात राहते. पूर्वीच्या काळी

लेखनाची सोय नव्हती त्यामुळे प्राचीन साहित्य हे मुखद्गत केले जात होते. पिढ्यानपिढ्या साहित्य मौखिक स्वरूपात पाठांतर करून पुढील पिढ्यांकडे पोहोचवले जात असत. त्यामुळे दीर्घ स्वरूपाचे गद्य लेखन न करता काव्य स्वरूपात यमक साधून काव्यरचना केली जात. त्यामुळे काव्याच्या स्वरूपात साहित्याचा प्रचार-प्रसार करणे सोपे होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर काव्य निर्माण झाले.

कालांतराने लेखन कलेचा शोध लागला आणि मोठ्या प्रमाणात साहित्य निर्माण होऊ लागले. सुरुवातीला भूर्जपत्रे, शिलालेख, ताम्रपट, कापड, कागद ते आजच्या काळातील आंतरजालावर आभासी लेखन अशा प्रकारे लेखन माध्यमांमध्ये विकास होत गेला. माध्यम म्हणजे तुमचे विचार लोकापर्यंत पोहोचवणारे साधन होय. वृत्तपत्र, दूरचित्रवाणी, रेडिओ, चित्रपट, लघुपट व सोशल मीडिया हे सर्व घटक म्हणजे माध्यम होय. वर्तमानपत्र, रेडिओ, टेलिफोन, दूरचित्रवाणी, इंटरनेट, संगणक, मोबाईल ही माध्यमांची खरी क्रांती होय. प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व सोशल मीडिया हे आजच्या काळातील अत्याधुनिक प्रसारमाध्यमे आहेत. आज आंतरजालामुळे जग खूप जवळ आले आहे. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हाट्सअप व यूट्यूब यासारख्या समाज माध्यमांमुळे आपली मते विचार, कला, साहित्य व भावना व्यक्त करणे सहज साध्य व सोपे झाले आहे. समाजमाध्यमांतून सर्वसामान्य स्तरापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. समाजमाध्यमे हाताळण्यातील सुलभता व सहजता यामुळे ती कमी कालावधीत लोकप्रिय झाली आहेत. जुनी पारंपरिक संपर्क माध्यमे आता कमी महत्वाची होऊ लागली आहेत. आंतरजाल, संगणक व मोबाईल फोन यामध्ये झालेल्या क्रांतीमुळे संपूर्ण जगावर समाज माध्यमांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. आज जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात घडलेली घटना प्रथम समाजमाध्यमांवर येते. त्यामुळे प्रत्येकजण समाज माध्यमांचा वापर आपल्या सोयीनुसार व गरजेनुसार करत आहे.

समाज माध्यमांचा वापर आज आपण मनोरंजन, ज्ञान, आवड, कला, छंद झोपण्यासाठी करतो तसेच व्यापार, व्यवसाय, सामाजिक चळवळी, राजकारण आरोग्य, शिक्षण व साहित्य क्षेत्रात ही करत आहोत. समाज माध्यमांचा वापर करून उद्योग- व्यवसाय वाढविता येतात. तसेच साहित्य क्षेत्रातही समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात आज अनेक भाषा बोलल्या जातात. या विविध भाषांत मुबलक असे साहित्य उपलब्ध आहे. अगदी ग्रामीण स्तरापासून ते जागतिक पातळीपर्यंत अनेक थोर, विचारवंत, साहित्यिक यांचे पर्यंत अनेकजण साहित्य निर्मिती करत असतो, पण प्रत्येकाच्या साहित्याला प्रसिद्धी मिळेलच असे नाही. कारण पारंपरिक छापील माध्यमांतून साहित्याचा प्रसार करणे प्रत्येकाला शक्य नसते. कारण तेवढा वेळ,पैसा व माहिती प्रत्येकाकडे नसते. पण ते आता शक्य झाले आहे समाज माध्यमांनी निर्माण केलेल्या व्यासपीठांमुळे. आज फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब यासारख्या समाज माध्यमांवर साहित्याची देवाण-घेवाण, प्रसार  करणारे अनेक पेजेस ग्रुप्स, चॅनेल्स आहेत. यावरून कोणत्याही समाजातील कोणतीही व्यक्ती आपल्या कथा, कविता, कादंबरी विचारांची मांडणी घरबसल्या समाज माध्यमातून करू शकतो व कौतुक, शाबासकी व प्रसिद्धीची थाप मिळवू शकतो.

याच समाजमाध्यमांचा वापर मराठी साहित्य प्रसार व  प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. आज मराठी भाषेमध्ये अनेक साहित्य प्रकार उपलब्ध आहेत. कथा, कविता, कादंबरी व  नाटक यासारख्या साहित्य प्रकारांची देवाण-घेवाण फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब,संकेतस्थळे व ब्लॉग्ज यासारख्या समाज माध्यमावरून होत असते. कथा, कविता, कादंबरी, नाटक,

व्याकरण या संबंधित अनेक स्वतंत्र पेजेस, ग्रुप्स, चॅनल्स आज समाज माध्यमावर उपलब्ध आहेत. पण या सर्व साहित्य प्रकारांमध्ये कविता हा साहित्यप्रकार सर्वात लोकप्रिय असा आहे. मराठी संस्कृतीचा वाहक म्हणून कविता या साहित्य प्रकाराकडे पाहिले जाते. आज आपणास दिसून येणारी रुढी, परंपरा, चालीरिती, सण, उत्सव, पूजाअर्चा, आरती, श्लोक हे सर्व कवितेच्या रूपाने आपल्यापर्यंत ओवी, अभंग, किर्तन, गीते, भारुडे, लळीत, संगीत या स्वरूपात पोहोचले आहे. कवितेच्या रूपाने भावना व्यक्त करणे सोपे असते. कवितेची रचना व आकार मर्यादित असल्याने कोणीही व्यक्ती कविता करण्याचा मोह आवरू शकत नाही. त्यामुळे कवितेचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे.त्यातच फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब यासारख्या समाज माध्यमांच्या उदया नंतर कवितेचा प्रसार अधिक व्यापक झाला आहे. आज विविध वैशिष्ट्यांनी युक्त समाज माध्यमांची व्यासपीठे उपलब्ध असल्याने मराठी कवितेला आज डिजिटल व्यासपीठ मिळाले आहे. समाज माध्यमे ही मराठी कवितेच्या प्रसारात आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे मराठी कवितेची अलीकडच्या काळातील समाजमाध्यमांची भूमिका याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**नवोदित कवींचा उदय :**

फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब, ब्लॉग्ज व संकेतस्थळे यासारख्या समाजमाध्यमांवर कवितेसाठी अनेक पेजेस, चॅनेल्स आहेत. या ग्रुप्स, चॅनलवर अनेक कवी, वाचक व फॉलोवर्स असतात. समाजमाध्यमे वापरण्यातील सुलभता, पाहिजे तेव्हा वापरण्याचे मुभा, कमी वेळात व कमी खर्चात वापरता येण्याची सुविधा यामुळे कविता प्रसारासाठी या समाजमाध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब संकेतस्थळे यावर कविता लिहिणे, कविता वाचन व गायन यासारखे अनेक कार्यक्रम घेतले जातात. या व्यासपीठावर समाजातील कोणत्याही स्तरातील व्यक्ती आपली स्वतःची कविता लिहू शकतो, म्हणू शकतो, गायन करू शकतो. त्यांच्या कवितेस लगेच प्रतिक्रिया, प्रसिद्धी मिळू शकते. त्यामुळे नवोदित कवींचा उदय होऊ लागला आहे. नवोदित कवींजवळ असलेली प्रतिभा शक्ती जगाला माहिती होत आहे. नवोदित कवींना पारंपरिक पद्धतीने कविता छापणे, प्रसिद्ध करणे ही गोष्ट खर्चिक व वेळ खाऊ आहे. पण समाज माध्यमांवरून कविता सादर करणे व प्रसिद्ध मिळविणे हे सोपे आहे. त्यामुळे मराठी कविता लेखन मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. अनेक नवोदित कवी, तरुण, गृहिणी, वृद्ध व्यक्ती आपल्या कविता समाजमाध्यमांवर सादर करून प्रसिद्धी व प्रतिक्रिया मिळवत आहेत. आपली कविता लोकापर्यंत पोहोचवण्याची संधी या नवोदित कवींना समाज माध्यमांमुळे मिळत आहे.

**व्यापक व्यासपीठ :**

आज जगभरात ६०% हून अधिक लोक इंटरनेट वापरत आहेत. तसेच भारतात ८० कोटी सेलफोन धारक आहेत व त्यांची संख्या दरमहा ५० लाखांनी वाढत आहे. आज भारतात स्वस्त झालेले इंटरनेट व मोबाईलच्या किंमती यामुळे मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांचा वापर केला जात आहे. याच समाज माध्यमांचा वापर करून अनेक जण आपल्या साहित्याचा प्रचार आणि प्रसार करत आहेत. मराठी साहित्यामध्ये जास्त करून कविता या साहित्य प्रकारासाठी समाज माध्यमांच्या व्यासपीठांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. मराठी साहित्य संकेतस्थळे, ब्लॉग्ज, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब यासारख्या विविध समाज माध्यमांच्या माध्यमातून काव्य साहित्याचे सादरीकरण, गायन, वाचन व स्पर्धा घेतल्या जात आहेत. या

काव्यस्पर्धांचे गायन, सादरीकरण हे स्थानिक पातळीपासून विश्व पातळीपर्यंत आयोजित केले जातात. 'मायबोली' व 'मिसळपाव' यासारख्या साहित्य संकेतस्थळावरून कवितेस जागतिक व्यासपीठ मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण, दुर्गम भागातील कवींना यामुळे एक व्यापक व्यासपीठ निर्माण झाले आहे. आज फेसबुक, इंस्टाग्राम व यूट्यूबच्या माध्यमातून अनेक काव्यस्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामधून अनेक नवोदित कवी सहभाग घेऊन आपल्या प्रतिभेचे सादरीकरण करतात. त्यामुळे तळागाळातील, ग्रामीण भागातील, प्रतिभा जगासमोर येते. समाजमाध्यमांच्या रूपाने एक व्यापक व्यासपीठ निर्माण झाले आहे. कमी वेळात, कमी खर्चात जागतिक स्वरूपाचे व्यापक व्यासपीठ मराठी कवितेला समाजमाध्यमांमुळे मिळते आहे. मराठी कवितेला आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रसिद्धी मिळत आहे. समाज माध्यमांमुळे कविता फक्त मराठी वाचकापर्यंत मर्यादित न राहता इतर भाषिक प्रदेशापर्यंतही पोहचली आहे. यामुळे मराठी कवितेला आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रसिद्धी मिळत आहे.

**संवाद सुलभता आणि प्रतिक्रिया :**

संवाद सुलभता ही तर समाजमाध्यमांची खासियत आहे. फेसबुक, इन्स्टग्राम, युट्यूब यासारख्या समाज माध्यमांवर काव्यवाचन, गायनाचे अनेक कार्यक्रम, स्पर्धा घेतल्या जातात. या समाजमाध्यमांचा वापर करून नवोदित कवी, सुप्रसिद्ध कवी आपल्या कवितांचे सादरीकरण, गायन व वाचन करत असतात. समाजमाध्यमांच्या लाईक्स, फॉलो, सबस्क्राईब्स, शेअर व कमेंट या वैशिष्ट्यांमुळे आपण लगेच आपली प्रतिक्रिया मत, संवाद व्यक्त करू शकतो. समाजमाध्यमांच्या प्रतिक्रिया देण्याच्या वैशिष्ट्यांमुळे कवी, साहित्यिक यांच्याशी थेट संवाद साधता येतो.

कवी, चारोळीकार, गझलकार यांच्याशी रसिक लोक थेट संवाद साधू शकतात. तसेच आपल्या प्रतिक्रिया देऊ शकतात. त्यामुळे केवळ वर्तमानपत्र, दूरदर्शन, व्हिडिओज मध्ये पाहिलेले, अनुभवलेले कवी, लेखक, साहित्यिक यांच्याशी आपण एका क्लिकवरती संवाद साधू शकतो, प्रतिक्रिया देऊ शकतो. या कारणाने अलीकडच्या काळात समाजमाध्यमांच्या या व्यासपीठामुळे मराठी काव्य व कविता यांचा प्रसार व सादरीकरण करणे सोपे झाले आहे. नवोदित कवी प्रतिथयश कवींशी चर्चा संवाद साधू शकतात. आपल्या कवितांवर त्यांचे मत, प्रतिक्रिया मिळवू शकतात. त्यामुळे कवी-कवींमध्ये संवाद सुलभता निर्माण होते. वाचक विविध प्रकारच्या भाषांमधून कवीला प्रोत्साहन व सूचना देतात. हे आजच्या समाजमाध्यमांचे वैशिष्ट्य आहे.

**प्रकाशन आणि विक्री :**

कवी, लेखक व साहित्यिकांना आपले विचार, भावना वाचकापर्यंत पोहचविण्यासाठी आपल्या साहित्याचे प्रकाशन करावे लागते. हे प्रकाशन करणे कवी, लेखकांसाठी मोठे दिव्य असते. प्रकाशन करण्यासाठी चांगला प्रकाशक शोधणे, कवितासंग्रहाचे मुद्रण करणे, प्रकाशन करणे व प्रकाशनानंतर त्याची विक्री व्यवस्था लावणे इ.बाबी कराव्या लागतात. आणि या सर्व बाबी खर्चिक व वेळखाऊ आहेत. दुर्गम भागात राहणारे शारीरिक अस्वास्थ्य असणारे कवी आपल्या कविता संग्रहाचे प्रकाशन करू शकत नाहीत. तसेच त्यांना कोणाचे मार्गदर्शनही भेटत नाही.

अशावेळेस फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब,संकेतस्थळे व ब्लॉग्ज सारख्या समाजमाध्यमांमुळे साहित्यांचे प्रकाशन आणि विक्री करणे सोपे झाले आहे. घरबसल्या कवी आपल्या कविता संग्रहाचे प्रकाशन व विक्रीचा या समाज माध्यमांतून करू शकतो. 'मायबोली' व 'मिसळपाव' यासारख्या साहित्य संकेतस्थळावरून आपल्या

कविता प्रकाशित करू शकतात. तसेच 'किंडर डायरेक्ट पब्लिशिंग' या ॲमेझॉनच्या प्रकाशन सेवेचा वापर करू शकतात. लेखक आणि वाचक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी 'विश्व मराठी परिषदे' तर्फे लेखकांना स्वतःचे ऑनलाईन पुस्तक दालन सुरू करण्याची सुविधा निर्माण करून दिलेली आहे. तसेच 'गुगल बुक्स' वरून ई-बुक स्वरूपात कवी- लेखक आपले कविता संग्रह प्रकाशित करू शकतात. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट व बुक गंगाद्वारे आज लाखो पुस्तकांची विक्री केली जाते. त्यामुळे समाजमाध्यमांमुळे कविता संग्रहाचे प्रकाशन आणि विक्री करणे सोपे व कमी खर्चिक झाले आहे.

**स्पर्धा आणि संधी:**

मराठी मध्ये कविता हा एक महत्त्वाचा साहित्य प्रकार आहे. काव्यातून जीवन जगणे ही एक मानवी वृत्ती आहे. कवितेची सुरुवात हृदयातून होते. त्यामुळे प्रत्येकाला कविता करण्याची इच्छा असते. या इच्छेतून अनेक नवोदित कवी निर्माण होतात. या प्रत्येकाला आपले कवित्व सिद्ध करण्यास संधी मिळत नाही, पण अलीकडच्या काळातील फेसबुक, ट्विटर इंस्टाग्राम, युट्यूब व व्हॉट्सॲप यासारख्या समाजमाध्यमांनी मराठी कवितेला एक डिजिटल व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहे. यामुळे नवोदित कवींना एक संधी निर्माण झाली आहे. समाजमाध्यमांच्या मदतीने कविता कवी पर्यंत मर्यादित न राहता हजारो रसिकांपर्यंत पोहोचत आहे. फेसबुक, इंस्टाग्राम व युट्यूब यासारख्या समाजमाध्यमांवर कविता सादर करण्याच्या अनेक स्पर्धा, वेबिनार व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन कमी वेळात हजारो रसिकापर्यंत कवी पोहोचू शकतो. या स्पर्धामुळे कवींना आपली कला अधिक चांगली करण्याची प्रेरणा मिळते. वेबिनार्स व कार्यशाळा यामुळे कवितेची नवीन कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळते. तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून समाज माध्यमांवर कविता सादर करण्याचे नवे कौशल्य प्राप्त होते. समाज माध्यमांमुळे नवोदित कवींना स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळते.

**मराठी कवितेचा प्रसार करणारी समाजमाध्यमे :**

**१. फेसबुक :**

फेसबुक हे लोकप्रिय व्यासपीठ आहे. या व्यासपीठावर अनेक लोकप्रिय मराठी कविता समूह आहेत. त्यामध्ये अनेक कवी आपल्या कविता सादर करतात. त्यावर चर्चा केली जाते. तसेच 'फेसबुक लाईव्ह' सत्रांच्या स्वरूपातही काव्य वाचन व सादरीकरणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. रसिक सदस्य एकमेकांच्या कवितावर लाईक्स, कमेंट्सच्या माध्यमातून प्रतिक्रिया देतात. चर्चेत सहभागी होतात. फेसबुकवर **मराठी कविता प्रेम मैत्री, सुंदर मराठी कविता, कविता तुझ्यासाठी, मराठी कविता संग्रह, मराठी काव्यतरंग व कविता : तुझी आणि माझी** यासारखे लोकप्रिय समूह आहेत.

**२. इंस्टाग्राम :**

खास तरुणांसाठी निर्माण झालेले व्यासपीठ अशी ओळख असणारे इंस्टाग्राम हे आजचे लोकप्रिय व्यासपीठ आहे. या व्यासपीठावरून 'लाईव्ह कविता' कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केले जाते. या व्यासपीठावरून विविध कवींच्या कवितांचे वाचन-गायन सादर केले जाते. इन्स्टाग्रामच्या 'स्टोरीज लाईव्ह' या वैशिष्ट्या मुळे कवितांचे थेट सादरीकरण केले जाते. त्यास वाचक- रसिकांचा प्रत्यक्ष लाईक्स, कमेंट्सद्वारे प्रतिसाद मिळतो. इंस्टाग्रामवर **मराठी कविता संग्रह, मराठी_कविता, इंस्टा मराठी कविता, आजकालच्या कविता व कवी कट्टा** इ.पेजेस आहेत.

**३. युट्युब :**

व्हिडिओ शेअरिंग सोशल नेटवर्किंग साईट असे स्वरूप असणाऱ्या युट्यूब वरूनही मराठी कविता संदर्भात अनेक चॅनेल्स चालवले जातात. या व्यासपीठावर नियमित काव्य वाचन सत्रे आयोजित केले जातात. अनेक नवोदित कवी 'युट्यूब लाईव्ह' च्या माध्यमातून काव्य गायन, वाचन स्पर्धेत सहभागी होतात. इथे अनेक कवींचे काव्यवाचन पाहण्याची व ऐकण्याची संधी मिळते. युट्यूब वर **साहित्य केसरी, गझल मित्र, Voice Kraft, Poem Katta, अक्षर यात्री व कविता कट्टा** इ.चॅनेल्स सुरू आहेत.

**४. ट्विटर :**

जगातील एक मायक्रोब्लॉगिंग वेबसाईट म्हणून ट्विटरला ओळखले जाते. सध्या ट्विटर या व्यासपीठावरून मराठी कवितांचे सादरीकरण, काव्यवाचन गायन असे कार्यक्रम घेतले जातात. त्या कार्यक्रमास, सादरीकरणास ट्विट-रिट्विट करून प्रतिक्रिया दिल्या जातात.ट्विटर हे वेगवान संदेश वाहनासाठी ओळखले जाते. ट्विटरवर सध्या **मराठी कविता, @marathi-kavita, @Marathi_Kavita, Marathi-Poemes** इ. समूह आहेत.

**५. ब्लॉग्स व संकेतस्थळे :**

मराठी कविता लिहिणाऱ्या कवींनी व कवितेची आवड असणाऱ्या मराठी प्रेमींनी स्वतःचे मराठी कविता ब्लॉग्ज व संकेतस्थळे सुरू केले आहेत. त्यावरून अनेक कविता संग्रह सहजपणे लोकांना उपलब्ध होतात व विविध कवितासंग्रह पाहायला मिळतात.मराठी कवितेसंदर्भात मायबोली, मिसळपाव यासारखी काही लोकप्रिय संकेतस्थळे उपलब्ध आहेत.

हे काही प्रमुख समाज माध्यमांवरील मराठी कवितेसंदर्भात असणारी पेजेस, ग्रुप्स, चॅनेल्स व हँडेल्स आहेत. जे मराठी कवितांच्या प्रचार प्रसार आणि लोकप्रियतेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

मराठी साहित्य परंपरेमध्ये आज समाजमाध्यमांचे महत्त्व खूप वाढले आहे. मराठी साहित्य प्रकारांमध्ये विशेषतः कवितेच्या प्रसारात आणि विकासात समाज माध्यमे एक महत्त्वाचे साधन ठरली आहेत. ही समाज माध्यमे आज मराठी काव्यप्रसारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. या समाजमाध्यमांवरील व्यासपीठे सहज, सुलभरित्या कमी वेळात व कमी खर्चात उपलब्ध होत आहेत. त्यामुळे नवोदित कवींना आपली प्रतिभा प्रदर्शित, व्यक्त करण्यासाठी सुलभ व्यासपीठ मिळाले आहे. या नवीन व्यासपीठामुळे काव्यवाचन आणि काव्यलेखनाची पद्धती बदलली आहे. आज कवी आपली कविता घरबसल्या काही मिनिटात जगभर प्रदर्शित करत आहेत. त्यामुळे मराठी कवितेचे वाचनवर्तुळ मोठ्या प्रमाणात वाढले आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, ब्लॉग्ज, संकेतस्थळे युट्युब सारख्या माध्यमातून मराठी कविता जगभर पोहोचली आहे. त्यामुळे मराठी कवितेची लोकप्रियता वाढली आहे. वाचक-रसिक विविध समाज माध्यमांच्या व्यासपीठावरून मराठी कवींना प्रोत्साहन व सूचना देतात. संवाद सुलभता ह्या समाजमाध्यमांच्या वैशिष्ट्यांमुळे मराठी कवितेची लोकप्रियता वाढत आहे. समाज माध्यमांमुळे मराठी कविता अधिक सृजनशील, विविधतापूर्ण व व्यापक बनली आहे.

अशाप्रकारे समाजमाध्यमांमुळे मराठी कविता अधिक समृद्ध, वैविध्यपूर्ण व व्यापक स्वरूपात लोकप्रिय झालेली आहे. त्यामुळे मराठी कवितेचा जलद व्यापक प्रसार झालेला आहे. समाजमाध्यमांचा मराठी कवितेवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारे परिणाम होत असला, तरी मराठी कवितांचा साहित्यिक दर्जा कायम ठेवण्यासाठी सामाजिक माध्यमांच्या संयमी व विवेक वापर करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. नसिराबादकर ल.रा. 'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, प.आ.ऑक्टोबर २०२३.
२. यादव आनंद, '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च २००१.
३. बोराटे योगेश, 'सोशल मीडिया', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, प्र.आ. १ मे २०१९.
४. कहाते अतुल, 'फेसबुक', मनोविकास प्रकाशन, पुणे सहावी आवृत्ती २१ सप्टेंबर २०२०.
५. www.facebook.com
६. www.maayboli.com
७. www.misalpav.com
८. www.youtube.com
९. www.instagram.com
१०. www.wikipedia.org